## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 11/01/2020 (शनिवार)
## (सकाळ)

---

### मुरूम चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 किमी अंतरावर मौजा दहेगाव फाटा येथे दिनांक 10/01/2020 चे 13.00 वा. दरम्यान एमच–40/बीएफ–8288 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी नामे– धर्मेद्र किशोर सिंग जचपेले, वय 32 वर्ष, रा. निंबा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास मुरूम किं. 1,500/–रू. ची भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 4,01,500/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार उमेश ठाकरे, पो. स्टे. पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. पळनाटे हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 7 कि. मी अंतरावर मौजा दहेगाव रंगारी येथे दिनांक 10/01/2020 चे 00:01 वा. ते 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शमशाह रहमान अन्सारी, वय 44 वर्ष, रा. दहेगाव रंगारी यांच्या घरा शेजारी असलेल्या घरात ठेवलेल्या 12 बकऱ्या किंमती 1,10,000/– रू. च्या अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा वारेगाव येथे दिनांक 07/01/2020 चे 12:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मुनावर छोटु पठाण, वय 40 वर्ष, रा. वारेगाव यांच्या मालकाचे बऱ्या चारण्यासाठी नेले असतांना मोटरसायकवर आलेले 2 अज्ञात आरोपीतांनी एकुण 6 बकऱ्या किंमती 15,000/– रू. च्या चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक बिजवाड हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मुर्तीरोड हनुमान नगर, काटोल येथे दिनांक 10/01/2020 चे 10:00 वा. ते 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रत्नाकर गुणवंत भस्मे, वय 40 वर्ष, रा. लक्ष्मी नगर, काटोल हे त्यांची एमएच–40/ई–1091 क्रमांकाची हिरो होंडा पॅशन प्लस मोटरसायकलने मुर्ती रोड हनुमान नगर काटोल जवळील शेतात गेले होते. फिर्यादीने त्यांची मोटरसायकल रोडच्या बाजुला असलेल्या कॅनल जवळ उभी करून ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची किंमती 8,000/– रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 25 कि. मी अंतरावर मौजा शिवनफड नाड येथे दिनांक 09/01/2020 चे 17:00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरज भुलचंद चव्हाण, वय 19 वर्ष, रा. शिवणफड नाड (तांडा), ता.भिवापुर यांची आजी सौ. लालीबाई या घरून गुरा ढोरांचा चारा पाणी करण्यासाठी जात असतांना आरोपी क्र. 1) नामे– गं.भा. सरस्वताबाई राठोड हिने फिर्यादीच्या आजीला "तु शेतीचा हिस्सा मागुन पाय" असे म्हटले यावरून फिर्यादीच्या आजीने "मला हिस्सा पाहीजे नाही" या कारणावरून आरोपी क्र. 01 हीने फिर्यादीच्या आजीसोबत भांडण करून शिवीगाळ करून सेंट्रीगच्या पाटीने डाव्या हाताच्या मनगटावर मारहाण केले. फिर्यादी हा सोडविण्यासाठी गेला असता आरोपीने त्याचे सोबत सुध्दा भांडण करून आरोपी क्र. 02) 2) विरेंद्र राठोड
3) रवि राठोड व त्याचा लहान भाउ, तिन्ही रा. शिवनफड नाड (तांडा) यांनी सेंट्रीगच्या पाटीने मारल्याने त्यांना सोडविण्यासाठी फिर्यादीची आई आजोबा आजी लहान भाउ गेले असता आरोपीतांनी संगणमत करून त्यांना सुध्दा लाकडी काठीने मारहाण करून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मारोती राऊत हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर